# अटी-शर्ती

१. कुटुंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याबाबत पुरावा म्हणून मालमत्ताधारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याबाबतची पावती / निवडणूक ओळखपत्र / मतदार यादीतील नांव / पाणीपट्टी / वीजबिल / आधारकार्ड / तीन वर्षाचा भाडे करारनामा / पासपोर्ट / रेशनकार्ड / विवाह नोंदणी दाखला / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक पुरावा म्हणून सादर करावा लागेल. ( उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील )

२. विधवा महिलेच्या पतीच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रमाणित प्रत, परित्यक्ता असल्याबाबत पुरावा तसेच घटस्फोटीत महिलांनी मा. न्यायालयात दावा दाखल केला असल्यास त्याबाबतची प्रत अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील.

३. नाशिक महानगरपालिकेच्या शाळामध्ये इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्‌यार्थी या योजनेकरीता अर्ज करू शकत नाही.

४. अर्जदार महिलेच्या मुलाने मागील शैक्षणिक वर्षातील शिक्षण पूर्ण केलेले असल्याबाबत सोबत मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक राहील.

५. अर्जासोबत अलीकडील काळात काढलेले पालक व पाल्याचा पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक आहे.

६. अर्जासोबत जोडणेत आलेले सर्व कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली असावीत.

७. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजूर करणे किंवा नाकारणेचा अंतिम अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहील.

८. पाल्य ज्या वर्गात शिकत असेल त्यावर्षीचे बोनाफाईड तसेच मागील वर्षीचे मार्कशिट जोडणे आवश्यक राहील.